श्री. नरवणे गोरख उध्दवराव, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-याची नेमणुक करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/५३२३/६६२/२०२५
अहिल्यानगर दिनांक /०१/२०२५
06/02/2025

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/५३२३/१५८०/२०२३ दि १३/१२/२०२३
२. इकडील दोषारोप पत्र क्र.साप्रवि/आस्था-३/५३२३/१५८१/२०२३ दि १३/१२/२०२३
३. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र क्र.आस्था-१/२८१/२०२३ दिनांक ०७/०६/२०२४
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (५)

श्री. नरवणे गोरख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे गट शिक्षण कार्यालय, पंचायत समिती जामखेड येथे कार्यरत असताना अनाधिकृत गैरहजर रहाणे, कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा करणे, वरिष्ठांच्या आदेशाचे अवमान करणे अशाप्रकारचे गैरवर्तन केल्याने संदर्भ क्र. १ अन्वये श्री. नरवणे यांना सेवानिलंबीत करणेत आलेले आहे. संदर्भ क्र.२ अन्वयेचे ज्ञापन दोषारोप श्री. नरवणे यांना संदर्भ क्र. ३ अन्वये बजाविण्यात आलेले असुन सदर ज्ञापन दोषारोप पत्रामध्ये त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोपाबाबत श्री.नरवणे यांनी खुलासा सादर केलेला नाही.

तरी श्री नरवणे यांचे विरुध्द चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री. अमोल शिवाजीराव दिवटे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी.

परिशिष्ट क्र तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन, त्याचा संकेतांक क्र 202502060 40017 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 22-01-2025 17:07:07
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

..२

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग,नाशिक.सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते

२. श्री. अमोल शिवाजीराव दिवटे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड
व्दारा व प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड
२/-सदर आदेशाची प्रत संबंधितास बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र. १ ते

३. श्री. नरवणे गोरख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)
व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले
२/- सदर आदेशाची प्रत संबंधितास बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/--
(आशिष येरेकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर